# दान

एकदा अतिरेक्यांनो घरी याल का
उध्वस्त कुटुंब डोळ्यांनी पहाल का
बघा बघा ते बोबडे बालक
माय-बाप शोधताय
थरथरते म्हातारे
वाट लेकराची बघताय.
जा त्यांना उत्तर द्या.
ते पाहून तरी मानव व्हा
तुमचेही असेल कोणी
खरचटले की डोळा येते पाणी
तुमचे मन आमचा का दगड
असेल तर रक्ताचे रंग दाखवा
नाही तर आम्हालाही
क्रुरतेचे धडे शिकवा
धर्माने नाही शिकवली
कुणाची चिरफाड
जगा आणि जगु द्या
ही धर्माची असते आन
विश्वापेक्षा माणुस मोठा
माणुस संपला तर
विश्वच गोटा
मारणाराही मरतो
अमर थोडाच असतो.
मेल्यावर काय न्यायचे
राखेत सारे विलीन व्हायचे
माणूस असुन मानवमना
कधी तुला समजायचे
स्वार्थासाठी माजलेली मस्ती
एकदिवस थकते
सागराजवळ असुनही
तहान ना भागते
जगा आणि जगु द्या
हेच दान मागते
हेच दान मागते

**- सौ. रुपाली चिंचोलीकर**

# आमचे करंटेपण

देशाला स्वातंत्र्य देण्यासाठी
ज्यांनी आपलेच आयुष्य पणाला लावले
साता समुद्रातुन पोहुन
अनेक कष्ट भोगले
त्या स्वातंत्र्यवीराची आम्हाला आठवण होत नाही
त्यांच्या प्रतिमेचे पूजन
जयंती वा पुण्यतिथीस होतच नाही, एवढे करंटे
म्हणुन जन्माला आलोय
आमचीच आम्हाला लाज वाटते.
भगतसिंग मदतनलाल अन
क्रांतिवीर वासुदेव बळवंत
या साऱ्यांनीच देश स्वातंत्र्यासाठी
स्वतःच्या घरादारावर
आनंदाने नांगर फिरवले
इंग्रजांना नकोसे केले
पण लाचार नाही झाले
की, षंडही नाही झालेत
खरा पुरुषार्थ गाजवित
देशाच्या स्वातंत्र्यासाठी
बळी गेले पण
स्वातंत्र्य नको म्हणून...
इंग्रजांना शरण गेले नाहीत...
त्या देशवीरांमुळे आज आम्ही स्वंतत्र आहोत..
पण स्वातंत्र्यात नंगानाच
भ्रष्टाचार, दहशतवाद, वशिलेबाजी
करीत उजळ माथाने
जनतेच्या उरावर बसतोय
आकाशातुन हे दृष्य पाहुन
स्वातंत्र्यवीर मात्र आता
अश्रु गाळताना दिसतात...

**-दिपक जटाधार त्रिभुवन**

# पाऊसच व्हावं!

पावसाची प्रतिक्षा
करता करता
प्रत्यक्ष पाऊसच व्हावं
म्हणजे चकोर आपोआप
होता येईल
सोबतीला मोरपण नाचून नाचून
पाय सोलून घेईल
तत्पुर्वी कोकिळेची आळवणी
आणि समस्त पाटावरणाच्या
प्रतिक्रिया पण येतील
ज्यास धरतीचं अभिजात
जिव्हाळ्याचं इप्सित देखील
आणि मग तिला
साध्या अगमनाने बेभान
होताना पाहिलं की
कसं कृतार्थ झाल्या सारखं वाटेल
हळु हळु त्यातुनच एखाद्या
त्यागाचे महत्व पटू लागेल
आणि जगण्याला आणखी
एक नवीन परिमाण लाभेल

**- महमुद सारंग**
६/१६, पंचगंगा सोसायटी, शिवाजी नगर,
राबोडी २, ठाणे (प.) - ४००६०१.

# बॉम्बस्फोट

बॉम्बच्या त्या स्फोटामध्ये
एका वेळी असंख्य मरतात
उरलेले जख्मी होतात
जिवन सारे उध्वस्त होते
निरपराध्यांचे रक्त सांडते

मानवी शरिर विखरुन अस्ताव्यस्त पडते
धर्म, जात, भाषा, स्त्री, पुरुष, चेतन, अचेतन
भेद नसलेला रक्त नासांचा चिखल
आरोळ्या आक्रोश
भिती ग्रस्त धावपळ, जिव वाचण्याची धडपड

सरकारी यंत्रणा जागी होते
धावपळ विविध प्रकारे मदतकार्य सुरु होते
जनता सहकार्यात उतरते
दोन परस्पर विरोधी गोष्टी दिसुन येतात
बॉम्ब ठेवणारे माणुस की हीन, मदत करणारे
माणुसकीवीन

अनेक स्त्रिया विधवा होतात
अनेक पुरुष विधुर होतात
अनेक मुल अनाथ होतात
अनेक मातांचे वात्सल्य हरते
रक्ताचे नाते विटते

तू परत केव्हा येणार ?
चेहऱ्या वरच्या ह्या प्रश्नांचे
उत्तर काही सापडत नाही
कोणी होता बेपता त्याचा पत्ता लागत नाही
शोधाला ही दिशा नसते

हसऱ्या गालावरती
अश्रुंचा तो ओघळ येतो
नात्याच्या संबंधामध्ये

चिंतेचा डोंब उसळतो
जिवनाची विण उसवते

ठणक, वेदना, अपंग जिवन माथी येते
मानसिक आघात होतात
आधार हरवतात
पर्यायांची शोधा शोध होते
सहनशक्ती वाढते
वास्तव स्विकार होतो
राखेतून 'फिनिक्स' उठतो

मृत्यूच्या छायेत
नित्यकर्म बोलावत रहाते
असुरक्षिततेची ओळख होते
माणुसकीच्या वैरावर
माणुसकीचा विजय होतो!

**- अ. रा. पाटील**
कासा ब्लांका सोसायटी,
साई मंदीर समोर, रामदास वाडी,
मुरबाड रोड, कल्याण (प.)

# हेच खर वय

किती दिवस असं आई बापाच्या जीवावर
फुकट बसून खायाचं
अंगात घोड्याच बळ असताना
गाढवावांनी घरात लोळायचं
आजूबाजूच्या उनाड पोराबरोबर
बाहेर उनाडक्या करत फिरायचं
आणि रोज नव्या खोड्या काढून
काळ तोंडाला फासायचं
काम कर म्हटलं की
तोंड वाकडं करायचं
किती ही कोणी काहीही बोललं की
निर्लज्जावानी हसायचं
का म्हणून आपल्या नशीबी मित्रांनो
इतकं वाईट दिवस आणायचं
मनासारख काम मिळत नाही
हेच कारण रोज सांगायचं
पण आयुष्यात काहीतरी करुन दाखवायचं
हेच तर खरं वय असतं
कारण वेळ निघून गेल्यावर मग
सारच फसतं सारच फसतं!

**- संतोष किसन शिरावले**
एस. एस. ३, रुम. नं. ३६९, सेक्टर १५,
श्री दत्तकृपा चाळ, कोपरखैरणे,
नवी मुंबई - ४०० ७०९.

# संसार

संसाराच्या सागराला
नसतो कधी किनारा
आयुष्यभर यात पोहताना
सुख-दुःखाच्या लाटांनी
असतो हा भरलेला
कधी जोडीने, कधी एकट्याने
प्रवास करायचा असतो ठरलेला
संकटाच्या भोवऱ्यांनी
असतो हा वेढलेला
चुकून असतो एखादाच
त्यातून सुखरूप बाहेर पडलेला
थांबला तो संपला
हा नियम सर्वांना लागलेला
काम न करता जास्त दिवस
सांगा कोण आहे जगलेला ?
सांगा कोण आहे जगलेला?

**- संतोष किसन शिरावले**

# दहशतवाद आणि संस्कृती

हात जोडणे म्हणजे संस्कृती
हात तोडण्याची दहशतवादीच विकृती

मान सन्मान आणि अभिमानाची संस्कृती
सुड बदला अपमानाची दहशतवादी कृती

थोर साधु, संत संस्कृतीने घडविले
गुन्हेगार, पापी, हलकट दहशतवादाने दिले.

विस्कटलेले कार्य जोडण्याची संस्कृती
जोडलेले कार्य तोडण्याची दहशतवादाची कृती

संस्कृतीमध्ये होते दगडातल्या देवपणाचीही पुजा
दहशतवादामध्ये होते माणसांमधल्या राक्षसाची पुजा

जिवनाच्या संस्कृतीमध्ये मान सन्मान शान
दहशतवादाच्या संस्कृतीमध्ये असते फक्त किळसवाणी घाण

संस्कृती देशाला मिळालेले कोहिनुर रुपी वरदान आहे
दहशतवाद हे चिखलाने भरलेले घाणेरडे रान आहे.

संस्कृतीचे भविष्य उज्वल आणि अजरामर आहे
दहशतवादाचे भविष्य कुठीत आणि रोज मरणारे आहे

जगामध्ये संस्कृती सदा पुजनीय आहे
दहशतवाद मात्र सदा निंदनीय आहे.

सलाम माझा संस्कृतीला
धिक्कार करतो दहशतवादाला

**- अंकुश रामचंद्र जोष्ठे**
रु. नं. डी -१, प्लॉट नं. ८०, मयुरी सोसायटी,
ज्ञानोदय विद्यालयाजवळ, स्वा. सावरकरनगर, ठाणे ६.

# शपथ

चला शपथ घेऊया सत्याची, असत्त्यावर मात करण्याची
अबालवृध्दाचं रक्षण नि ऋण त्यांचे फेडण्याची
गरिबांचं दुःख पाहण्याची राष्ट्र बलवान करण्याची...
राष्ट्रपुरुषांचा आदर नि जिद्द त्यांची पूर्ण करण्याची ॥१॥
चला शपथ घेऊया हुंडाबळीची, हिंसाचार थांबविण्याची
अत्याचार रोखण्याची नि शांतता राखण्याची...
देशनिष्ठा ठेवूनी, तिरंगा उंच उंच फडकविण्याची ॥२॥
चला शपथ घेऊया भ्रष्टाचार मोडून काढण्याची
अंधारात लपलेलं सत्य उजेडात आणण्याची!
अंधश्रध्दा-जादुटोणा, भानुमती-भोंदुगीरी थांबविण्यासाठी...
एकसंघ देश बनवून, त्यास तडा न जाण्याची ॥३॥
चला शपथ घेऊया, पवित्र ज्ञानगंगेची
विद्याप्रसार करुनी देश साक्षर करण्याची
पुराणपोथी वाचण्याची नि संस्कृती जपण्याची...
देशप्रतिष्ठा ऊंचावून, विश्वशांती ठेवण्याची॥४॥
चला शपथ घेऊया, सृष्टीवरील सजीवांची
जीव जीव समजूनी शेजारधर्म शिकण्याची!
जाती धर्मात नि मानवात तेढ न लावण्याची, अन
देश सर्वांचा समजूनी, गुण्यागोविंदाने राहण्याची॥५॥
चला शपथ घेऊया, कृष्णाकोयनेची-तापीनर्मदेची
गंगायमुनेची-झेलमकावेरीची, भिमा-चंद्रभागेची
पाणी अडविण्याची नि पाणी जिरवण्याची..
कसदार भूमी बनवूनी, देश सुजलाम्-सुफलाम् करण्याची ॥६॥

**- बा. स.जानकर**
रेल्वे पोलीस वसाहत, घाटकोपर, बि. नं. १३/३, मुंबई - ४०० ०७५

# असे अतिरेकी येती

असे अतिरेकी येती
असे अतिरेकी येती
असे अतिरेकी येती
आणिक हैदोस घालूनी जाती
निष्पाप जनतेचा जीव घेऊनी
आरामात निघूनी जाती
असे अतिरेकी येती
असे अतिरेकी येती
आणिक बॉम्बस्फोट करून जाती
माणुसकीला काळे फासूनी
आसुरी आनंद मिळविती
असे अतिरेकी येती
आणिक बॉम्बस्फोट करुनी जाती
दोन क्षणांच्या त्यांच्या करामती
देशाची हानी करुनी जाती
असे अतिरेकी येती
असे अतिरेकी येती
आणिक धडा शिकवूनी जाती
राहू नका गाफील कुणीही
शत्रूची नजर आहे
आपल्या देशावरती
असे अतिरेकी येती

**- सुरेश गोविंद देहेरकर**
००२, तळमजला, गुरु सदन, बि. नं. ७, सी विंग,
शिवाजी चौक, कुळगाव - बदलापूर (पूर्व)
ता. अंबरनाथ, जि. ठाणे - ४२१५०३.

# दहशतवाद

दहशतवाद इथला संपणार कधी
सुख आणि शांती येणार कधी
अतिरेक्यांचे चाळे, थांबणार कधी
जातीय सलोखा, नांदणार कधी
निष्पाप जनतेचे जीव घेणार किती
अतिरेक्यांना उपरती येणार कधी
भय लोकांमधले जाणार कधी
अतिरेक्यांचे जाळे तोडणार कधी
बाहेर पडताना आता जीव होतो घाबरा
दहशतवाद्यांचा आहे, सगळीकडे दरारा
कधी येतात ते कुठुन सांगता येत नाही
जनतेच्या जीवाची आता शाश्वती राहिली नाही
या जगामध्ये सध्या अहिंसेला जागा नाही
हिंसाचाराला मात्र कुठेच अटकाव नाही
कसे जगावे जनतेने या दहशतीखाली
कसा ठेवावा भरवसा तिने सरकारी यंत्रणेवरी
दहशतवाद इथला संपणार कधी
माणूसकी धर्माचे महत्व कळणार कधी
खून-खराब्याने प्रश्न सुटत नाही
खोट्याचा विजय कधी होणार नाही
अतिरेक्यांना हे कळणार कध
दहशतवादाला ते सोडणार कधी

**- सुरेश गोविंद देहेरकर**
००२, तळमजला, गुरु सदन, बि. नं. ७, सी विंग,
शिवाजी चौक, कुळगाव - बदलापूर (पूर्व)
ता. अंबरनाथ, जि. ठाणे - ४२१५०३.

# स्वातंत्र्य-स्वैराचार

स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे

कमी कपडे घालणे म्हणजे

सुंदर दिसणे नव्हे

सुंदरता असते शालीनतेत

सुंदरता असते नम्रपणात

विचाराने सुंदर व्हा

मनाने सुदंर व्हा मर्यादा सोडू नका

सागराने मर्यादा सोडली तर काय होईल?

विनाशच ना?

आठवा स्त्रियांसाठी सावित्रीबाई फुले

किती कष्ट सोसले त्यांचा ठसा

उमदा आपल्या हृदयी

शृंगार करा स्वाभिमानाचा

शृंगार करा शैक्षणिक उंचीचा

निती मत्तेचा, मुल्याचा

मग बघा चेहरा स्वतःचा समाजाचा आरशात

तुम्ही किती सुंदर दिसताय

होय ना?

**सौ. विद्या विनोद कांबोज**
४०९/४७५३, बी विंग
टागोर नगर, विक्रोळी (पूर्व)
मुंबई - ४०० ०८३

# चंचल मन

मी असते स्वस्थ्य बसलेली
तेंव्हा मन बापूडे फिरत असते,
माझ्या अगोदर माझे,
मनच जाऊन पोहचलेले असते
मन कधी होते वासरु
मन कधी होते पाखरु
मन कधी होते हट्टी लेकरु
मन कधी होते
घट्ट रुतून मुळे माती मध्ये
उभे असलेले झाड
मन माझे बाई लई द्वाड
मन असते विद्युल्लते सम
मेघांनाही छेदून जाते
मी असते स्वस्थ्य बसलेली
तेंव्हा मन बापूडे फिरत असते
मन जसे आषाढातील मधमाशी
परतूनी येई आंब्यावरती
पुन्हा-पुन्हा बसशी
मन असते गाईच्या सडातील
दूधाची धार
वात्सल्याच्या सुखामध्ये ऊतू जात असते
मन होते खुळे कधी
अन बाळा सारखे
रडता-रडता हसत असते.

**सौ. विद्या विनोद कांबोज**
४०९/४७५३, बी विंग
टागोर नगर, विक्रोळी (पूर्व)
मुंबई - ४०० ०८३.

# भारत

मळवट भरल्या कपाळासम
स्थिती झाली भारतमातेची
जिकडे तिकडे हिंसाचार आतंकवाद
कुठे हरविला आमच्यातील सदाचार, समाजवाद
इथे बहुतेक राज्यकर्ते झाले स्वार्थी
करोडोत एखादे निःस्वार्थी (लालबहाद्दूर शास्त्री)
पांढरपेशी वस्त्र नेसती होते त्यांची कीर्ती
असे वाटते मायच झाली पोरकी
मोजकेच इथे सज्ञन बाकी दुर्जनाचीच भरती
एकेकाळची सुवर्ण-कृषी भुमी राज्यकहानी तिला
केली निक्रमी
लायकी नसलेल्याशी इथे होत आहे मैत्री
कधी केसाने गळा कापतील नाही त्यांची खात्री
अजुनही वेळ गेली नाही
देश बांधवानो जागे व्हा
देहातून स्वाभिमान जागवू या जागे व्हा.
दाखवून द्या जगाला (विश्वाला)
सारीच बोटे सारखी नसतात
अजुनही सुभाषचंद्र, शिवबा, भगत सिंगासाराखे
सुपुत्र मायभुमीच्या रक्षणासाठी येथे राहातात

**-विनोद जी. कांबोज**
४०९/४७५३, बी विंग
टागोर नगर, विक्रोळी (पूर्व)
मुंबई - ४०० ०८३.

# क्षत्रिय

घेऊं नको माघार क्षत्रिय
घेऊ नको माघार
हिंदु संस्कृती जपण्यासाठी
वाहिली लाल रक्ताची धाट
क्षत्रिया घेऊ नको माघार
सत्यासाठी घेई भरारी
बजरंगाची गदा स्फुरली
हिंदु सेना एक होऊनी
चौफेर सुटुदे शिवशक्तिचे स्वार।
हजारो वर्षाचा इतिहास आपुला
प्राण अर्पुनी हिंदुनी रक्षिला
घडा पापी म्लेंछान भरिला
फोडण्या घेई गीतेचा आधार
नरधिरा घेऊ नको माघार
मंदिर पाडुंनी मुर्ती पोडीती
मर्द मारुनी तरुणी पळविती
माता भगिनी रुपे बदलती
धरु पाहती संगिनी पातील
सत्वांस बदुं दे धार शुर विरा
तुमचे आमचे काही नसे हो
सुख शांतीचे राज्य नांदो
हाच मनि निर्धार शांति दुत
निर्धास्त तुझा संचार
तत्वासाठी मुल मारिते
खुर्चीसाठी घटना बदलते
अहिंसा ही जेल बोगते
करूं दुष्ट दुर्जनांचा संहार
तेहतीस कोट देव आपुले
विश्वनाथ हा असे सुत्रधार
साधका घेऊं नको माघार
क्षत्रिया चालवी ती तलवार

**- पी. विश्वनाथ**
जी २, कन कादित्य सोसायटी,
सहयोग मंदिर पथ, नौपाडा, ठाणे (प.)

# आईची कविता

मी मनाला म्हटल, आपण 'आई' वर कविता
करुया
तर मन म्हटल, त्यासाठीच मी कधीपासून
धडपडतोय

वाचा मला म्हणाली आईचे गुण किती गाऊ
संपणार नाही कधीही मी कितीही गात राहू

मग मी शब्दाला विचारलं तुमच काय मत आहे ?
म्हणे, माझी क्षमता नाही एवढी तिची महानता आहे

अंतःकरणाला काय वाटत? असे मी विचारले
तर 'आई' शब्द उच्चारतांच त्याला भरून आले

हृदय म्हणाले माझा कण नी कण आईचेच प्रेम आहे
मेंदू म्हणाला आईचे गुण गातो मी भाग्यवान आहे

शेवटी सर्वांना विचारून दोन शब्द लिहले
नम्रपणे सांगतो आई जे काही मला सूचले

माझे असणे तुझ्यामुळेच आहे
हे 'काव्य' तुझ्यामुळेच आहे
अन् 'आई' हे विश्व
तुझ्यामुळेच आहे.

**- शंकर गोपाळे**
सी-३९७, तुर्भे एमआयडीसी,
नवी मुंबई - ४०० ७०५.

# सलाम, मुंबई सलाम

मन सून्न झालं
बुध्दि बधीर झाली
पुन्हा एकदा महानगरीला
दहशतवादाने धडक दिली
या वेळचं त्यांचं लक्ष्य
मुंबईची जीवनवाहीनी
लोकलगाडी
वेगवेगळ्या बॉम्बस्फोटात
ठिकठिकाणी उध्वस्त झाली
शेकडो निरपराध जीव गेले
शेकडो जखमी-घायाळ झाले
म्हातारे आई-बाप निराधार झाले
अनेक बालकं अनाथ झाली
रक्त-मांसाचा चिखल चिवडता
जागोजागी शोककळा पसरली
चाचपडणारी तपास-यंत्रणा
धडपडणारी प्रसार-माध्यमे
अफवांचा पूर, चेहरे चिंतातू
प्रत्येक चेहऱ्यावर एकच प्रश्न?
किती येणार विघ्नं?
कशा-काशाला तोंड द्यायचं?
विक्रमी पाऊस, बॉम्बस्फोट
सदा-सर्वदा ट्रॅफिक जाम
ह्यांचा बंद, त्यांचं धरणं
वाढती गर्दी तिन्ही त्रिकाळ
तरीही पुन्हा उभं राहायचं
एकमेकांना आधार देत,
एकमेकांना सावरुन घ्यायचं
दुरुन पाहणारे, फक्त म्हणणार,
''सलाम, मुंबई सलाम''
तुमच्या सलामाने आम्ही खुलणार
तुमच्या प्रोत्साहनाने आम्ही फुशारणार
रहाट-गाडग्याला जुंपून घेणार
मजबूरी, नाईलाज
नाईलाजको क्या ईलाज?
नविन संकटं, नविन समस्या
निमुटपणे तोंड देणार
कुठवर चालणार हे सगळं?
कुठवरर रंगणार हा रक्तरंजीत खेळ?
हतबल जनता, षंढ शासन
भ्रष्ट व्यवस्था, त्रस्त जीवन
हे सारं बदलणार कोण ?
केव्हा ? कधी ? कसं.

**-अशोक कुळकर्णी**
८/५७८, ओरिएंटल स्टार, एम.एच.बी. कॉलनी,
गोराई रोड, बोरीवली (पश्चिम),
मुंबई - ४०० ०९१.

# भूमी लढवय्यांची

ही तर आमुची बाजाराची
गजबजलेली वाट
संध्याकाळी या पेठेमधि
गर्दी अन गोंगाट

छळ-कपटाने नामर्दासम
घडवून आणता स्फोट
निष्पाप जनांचे व्यर्थ सांडता
रक्ताचे पाट

असेल हिम्मत, तर या पुढती
खुल्या प्रांगणात
नाही टाकल्या अजून आम्ही
तलवारी म्यानात

भूमी आमुची लढवय्यांची
कपट इथे ना चाले
दैत्य वधाव्या इथेच फुटती
गवताला भाले
तरिही शांतिचे पुजारी आम्ही
भक्त अहिंसेचे
सर्व-धर्म-सम-भाव राखणे
ब्रीद असे आमुचे

दहशत त्यागुन हत्यार फेकुन
शरण तुम्ही यावे
दया क्षमा ही आमुची संस्कृती
प्रथम तिला वंदावे

**सुरेश्चंद्र वि. जोशी**
स्वस्तिक सोसायटी,
प. दीनदयाळ मार्ग, विष्णुनगर,
डोंबिवली (प.) - ४२१ २०२

# किंकाळी

लेक लाडाची आई बाबांची
तारीख नक्की केली मे महिन्यांची
झाली तयारी लग्न उरकण्याची
हिंदू संस्कृतीची जपणूक आई-वडलांची ॥१॥

आठवण आली माता पित्यांची
परवानगी घेतली सासू-सासऱ्यांची
वाट मी धरली माहेराची
मनात लाट उसळली आनंदाची ॥२॥

धन्याची वेळ झाली ऑफिस सुटण्याची
वाट पहात होते मी मोबाईलची
गप्पा आमच्या रंगात आल्या
६.२४ला किंकाळ्या ऐकू आल्या ॥३॥

नियतीच्या मनात भलतेच आले
बॉम्ब स्फोटाने महानगर हादरले
त्यात माझ्या धन्याने प्राण गमावले
उंबरठ्यावर आलेले सुख निघुन गेले ॥४॥

सासुरवाशिण मी दोन महिन्यांची
विधवा झालेमी कायमची
वेळ आली एकमेकांकडे पहाण्याची
सरकारला मात्र जाण नाही जबाबदारीची ॥५॥

**- विजय द. गुरव**
३०२, ओम साई चरण सोसायटी,
रंजन सोसायटी जवळ,
कुळगाव, बदलापूर (प)

# तिची रूपे अनेक

माझ्या मन मानसीत
तिचं एक रूप
कधी तेवसी पणती
कधी गाभाऱ्यात धूप
असं तिचं एक रूप माझ्या मनी मानसीत
नेसून हिरवी पैठणी
हातात हिरवा चुडा
अंगणी घालिते सडा
आणिते पाहुणे दारी
असं तिचं एक रूप माझ्या मनी मानसीत
करून वटपौर्णिमेचे व्रत
पाहिले तिला सावित्रीरुपात
घातले साकडे वटवृक्षाला
पती लाभो सात जन्माला
असं तिचं एक रूप माझ्यामनी मानसीत
मिळाले तिला सौभाग्याचे लेणे
संसारा राहिले नाही काही ऊणे
ती समई मी प्रकाश
संसार रथ हाकिते सावकाश
असं तिचं एक रूप माझ्या मनी मानसीत
गौरी गणपतीच्या सणात
फुगडीच्या तालात
गीतांच्या बोलात
धुंद होऊन नाचत
असं तिचं एक रूप माझ्या मनी मानसीत

**- विजय द. गुरव**
३०२, ओम साई चरण सोसायटी,
रंजन सोसायटी जवळ,
कुळगाव, बदलापूर (प)

# बेनझीर भुत्तो

दहशतवादाने रक्ताचे पाट वाहतात
तरी दहशतवादाच्या डोळ्यात मायेचा अश्रु तळत
नाही
त्यांच्या क्रुरकर्माने जीव जातो गरिबाचा
ज्याचे हाताच्या बोटावर पोट आहे त्याचा अशी
माणसे विनाकारण उध्वस्त होतात
रक्ताच्या थारोळ्यात, जुलुमी दहशताच्या गराळ्यात
कट्टरवादी इस्लाम जगाच्या नकाशात
आपली राजसत्ता, हुकुमत गाजवु पाहतो
बंदूकीच्या धाकाने सारेजग जिंकू पाहतो
कट्टर इस्लामच्या आड येणारा कुणी असो
मग तो,
लिकायत अलीखान असो
वालित झुल्फिकार अली भुत्तो असो
अन्यथा.. बेनझीर भुत्तो असो
इस्लामाबाद म्हणजे अणुबॉम्बपेक्षास्फोटकवाद
तो अमेरिकेचा वर्ल्ड ट्रेड सेंटर सुध्दा पाहत नाही
मोकाट सुटलेल्या जनावरासाराखा
आंधळ्या वादळासारखा.. बेभान
त्यांच्या मनात ना दया.. ना माया!
कठोर पाषाणालाही लाजवणारा क्रुर!
त्याच्या नसा नसत.. कट्टर इस्लाम!
जेहादचा सुरूंग पेरला जातो तो
राजकारणी सभा,मज्िजद, मदरशांमध्ये
अन् त्यातुन तयार होतो आत्मघातकी इसम
मग तो मागे वळुन पाहत नाही करित सुटतो मातम!
इस्लाम वाद कधीच पाहत नाही
बुरखाधारी स्त्रियांचे प्रश्न लोकांच्या रोजी-रोटी
शिक्षणाचे खरे प्रश्न?
अल्लाह! इस्लाम खतरे मेंच्या नावाने
पाकिस्तानात होत असलेली अराजकता
दहशतवादाचे तोफगोळे जो पर्यंत थंड होत नाही तो
पर्यंत हजारों 'बेनझीर भुत्तो'
बेबंद पाकिस्तानसाठी निःसंकोच बलिदान द्यावे
लागेल
बेनझीर भुत्तोची हत्या म्हणजे
तेजोमय प्रकाशाला झाकणारा काळकुट्ट अंधार
या अंधाऱ्या बंदिस्त खोलित चाचपणारा
पाकिस्तान-तालिबानी इस्लामी जेहाद
भारतासह अनेक सीमांवर गस्त घालित आहेत
या अश्वरुपी जेहादीला 'युनो'
लगाम घालील अशी आशा करुया
म्हणजे दहशतीच्या आगीत होरपळणाऱ्या
अखंड विश्वाला एका शांत आणि आनंदी रम्य
वनात घेऊन जाऊ या...
आणि जाताना रावळपिंडीच्या वाटेवर
बेनझीर भूतोंना विरगणांना म्हणुन सुमनांची
पुष्पमाला अर्पण करुया!!

**- पुरुषोत्तम सोनवडेकर**
चाळ ए ५०/६, देवनार म्यनिसिपल कॉलन,
गोवंडी, मुंबई ४०० ०४३.

# जया

कोण कुठलीही उपरी बया?
सगळे म्हणतात हिला जया
भरपूर प्रसिध्दी आणि मुबलक पैसा
महाराष्ट्राने यांना दिला
अन हिन मराठी अस्मितेचा अपमान केला
मुंबईत राहते पुर्ण पिढी
मराठी बद्दल मनात का अठी?
सुरक्षित राहील का यांची माडी?
पळता भुई करु थोडी
कुठुन उपटला हा 'प्रसाद'?
खाकी वर्दीचा एवढा माज
देशद्रोह्यांना यांची साथ अन
खऱ्या भुमिपुत्रांना करतो आत
'मुंबई नाही कुणाच्या बापाची'
हिम्त होतेच कशी या सापाची ?
मराठी माणसाला बोलण्याची बंदी
धनरांडग्यासमोर मान डोलावतो नंदी
जयाच्या वतीने बोलला अमिताभ
त्यालाही मोठ्या मनाने केले माफ
अशी ही आमची मराठी संस्कृती
नाही तुमच्यासारखी मनोविकृत्ती

**- विलास रावजी सोनावणे**
ए-१, एशियन, तळमजला, मनमाला टँक रोड,
माहीम (प), मुंबई - ४०० ०१६.

# नपुंसक

असाह्यतेच्या जाणिवेतुन
सात्विक संताप फुलून येतो
कितीही अराजक माजले तरी
आम्ही षंढतेने पाहत राहतो

स्वतःबरोबर अवंलंबितांचे
काम आमचे पोटभरण्याचे
सुख सुख म्हणुन कोंदट खोलीत
जीर्ण गादीवर स्वर्ग पाहाण्याचे

कुठे काही झाले कुणाचे
हात आमचे खिशातच रहायचे
परसदारी बांधुन मोर्चे
फुका वल्गना वदती वाचे
जे विचारे पेटुन उठती
विसरून सारी नाती गोती
शौर्याने ते रणात जाती
असो नसो चिरा न पणती
आम्ही वाचावीर फाकडे
अंग थर थरे शस्त्र न पकडे
मुर्च्छा येई पाहुनी रक्तांचे सडे
संकटाचे नावे काळीज अमुचे उडे

**-विजय अजंटीवाले**
ए-११/४०१, रायगड सोसायटी, श्री कॉम्प्लेक्स
फेज ३, आधारवाडी, जेल रोड, कल्याण (प.)

# जंजिरा

भ्रष्टाचारी मुषक अवतरले
राजकारण त्यांनी पोखरले
धर्म अधर्म त्यात शिरले
अणुबॉम्ब युध्द सुरू जाहले
बारा मार्च एकोशिसशे त्र्याणवला
महामुंबईत स्फोट झाला
मग मृत्युच इथे थरारला
मानवतेचा अंत झाला
बहुसंख्य प्राणास मुकले
कित्येक बंधू बेघर झाले
बघता नयनी अश्रू सुकले
देशद्रोही मोकाट सुटले
शोध घेण्या स्फोटकांचा
एक सैनिक भारताचा
चेतक जैसा राणा प्रतापचा
बाजी प्रभु जणू सिंहगडाचा
शअवान नव्हे जवान देशाचा
जंजिरा हुतात्मा अति भाग्याचा
स्फोटके हुंगता रोग श्वसनाला
स्फोटके शोधुनी संहार रोखिला
रणी लढुनी स्वर्ग मिळविला
मरण येऊनी अमर जाहला
लाज वाटू दे फितुरा तुजला
ह्या देशाचा प्रणाम त्याला

**- सौ. निर्मला आगळे**
ए/६ ,ग्रिन ऐर्कस बंगला सोसायटी,
श्री शनिमंदिराजवळ, देवनार सर्कल,
दिन क्व्यारी मार्ग
पांजरापोळ, चेम्बुर, मुंबई - ४०० ०८८.

# एक पोर

एक पोर आरशामध्ये
चेहरा निरखीत उभी
येणाऱ्या उद्याचा
मोहरा निरखीत उभी
आजी आणि पणजीची
सागंते साल साल
ऊर सोलून रक्ताचं
केलं कुंकू लाल
मंगळसुत्राचा फासावर
आमचेहाल
रक्तांतून वाहणारी
परंपरा निरखीत उभी
टपोऱ्य कणसासारखी
ज्वानी भरास आली
कशी चिरडतील तारुण्याची
पावलं उंबऱ्याखाली
सावित्रीने ओलांडलेला
उंबरा निरखीत उभी
पावडर, काजळ, लालीचा
रुपाला रंग देत
आईच्या करंड्याला
नकार देत देत
मनातल्या सख्याचा
हात हाती घेत
झुरणाऱ्या, डसणाऱ्या
नजरा निरखीत उभी
चुलीचा सूर्य व्हावा
हेच स्वप्न मनात
त्याचसाठी जळायचं
घराच्या उन्हात
हाच आपला चेहरा
खरा निरखीत उभी

**- अनिल साबळे**
क. भा. पाटील मुलांचे वसतिगृह, रु. नं. ३३, मुंबई
विद्यापिठ, कलिना, मुंबई - ४०० ०९८.

# एडस्

कळत-नकळत
करतोस देहात प्रवेश
प्रवास मरणाच्या रस्त्याने
तुझ-नाव-एडस्
रॉकेटसच्या हल्ल्यानं व्हावं
जसं असलेलं उध्वस्त
तसाच करतोस अस्थिपंजर देह तू
करतोस तू जीवनाचा अस्त
तुझा प्रवास आडवाटेने
जसा गनिमी कावा,
नाव तुझ ऐकताच
कुरतात लोक तुझा हेवा
सारीपाट संसाराचे तू
उधळून नेस्तनाबूत करतोस
पती विना पत्नी, पिता विना मुले
नाती तोडून निराधार करतोस
तरीही निष्ठूरतेने प्रगती तुझी
चालू ठेवलीस अविरत,
रोखणही कठिण तुजला
संशोधकांवरही तू केली मात
रोखतोस अनेकांचा श्वास
मृत्यूचा गळ्यात घालतोस पाश,
होतोय देहाचा हळूहळू नाश
असा जीव घेणा तुझा प्रवास

**श्री. अशोक कृष्णा कदम**
७/१४०, बी. पी. टी. नवीन कॉलनी,
नाडकर्णी पार्क, वडाळा (पूर्व)
मुंबई ४००० ३७.

# पैसा

जीवन जगताना पैशाची
प्रत्येकाला असते गरज
पण कष्टाशिवाय तो नाही मिळत
ज्याच्याजवळ  आहेपैसा
त्यालामिळतोमान-सन्मान
जे जे अडते ते पैशासाठी
पैशामुळे अडते-शिक्षण
पैशामुळे होते-भ्रष्टाचाराचे पोषण
पैशामुळे होते-नितीमत्तेच पतन
ज्याच्याजवळ असतो पैसा
त्याचे असते - समाजात वजन
ज्याच्याजवळ असतो पैसा
त्याचे असते-समाजात वजन
त्यांच्यात हातात असते - राजकारम
ज्याच्याजवळ असतो पैसा
त्याच्याच हातात असते - संपत्ती, उच्चशिक्षण
पैसा हा जगण्याचा
एक केंद्रबिंदू आहे
कुठेही जा
पैसा लागतोच लागतो
म्हणून...
पैशाचे मूळ शोधा
पैशाचे कुळ शोधा
पैसा येईल तुमच्या घरात
पण केव्हा?
जेव्हा कराल त्याचा पाठलाग
म्हणजेच कठोर परिश्रम
कठोर परिश्रम म्हणजे घाम गाळणे नव्हे,
विविध क्षेत्रात प्रगती, विकास
पैशाचे अस्तित्व कस्तुरीप्रमाणे आहे
धावत सुटायच की शोधून काढायचं
हे ज्याने त्याने ठरवायचे आहे
ज्याच्या हाती धन आणि सत्ता
तोच या जगाचा जगज्जेता
म्हणूनच मी म्हणतो
आपलं कर्तृत्व झाकून
ऊगाचचं नशीबाला दोष का देता ?

**श्री. अशोक कृष्णा कदम**

# हा हन्त हन्त !

प्रत्येकाच्या श्वासावर, आता त्यांची सत्ता आहे

कुणी चारल्या पैशावर, ही मग्रुर मजा आहे ॥१॥

रक्ता त्यांची भूक आणि तहान घातपात पाहणे आहे

शस्त्रे आणि बॉम्ब म्हणजे, त्यांच्या हातचे खेळणे आहे ॥२॥

मजबूत त्यांच्या, संघटनांची, नांवे रूपे अनेक आहेत.

दिशाहीन वाटेवरती, अतिरेकाचे उद्रेक आहेत ॥३॥

दहशतवाद सावधपणे, इप्सीत आपले साधत आहे

एकवाक्यता विहीन नेते, हा शापच बाधत आहे ॥४॥

जिकडे तिकडे वणवा आहे, काश्मीर तर उभे पेटलाय

कर्नाटकच्या जंगलात कोणी, वीरप्पनला जाऊन भेटलाय ॥५॥

कॅसेटवर कॅसेट त्याची सरकार बापडे ऐकून आलाय

चंदनाचे वन सुंगधी, झुरून झुरून सुकून गेलाय ॥६॥

गुलाब तरीहि फुलतो आहे, केशरमळे बहरतआहेत.

दतविहीन सोंड घेऊन, हत्ती रानांत विहरत आहेत. ॥७॥

मतांच्या राजकारणांत, पक्ष सारे गढले आहेत.

सत्तेच्या पिपासेंत ते आकंठ बुडले आहेत ॥८॥

कृतीपेक्षा भाषणबाजीत, आव्हाने ते स्वीकारतात

शब्दबंबाळ शरसधान, झेड सुरेक्षेतून करतात ॥९॥

रोखठोक अधिकाऱ्याला, शिक्षा म्हणून बदली आहे

अमूकगुन्हेगार मुक्त व्हावा, आतून रदबदली आहे ॥१०॥

पुराव्याअभावी सुटका, हा परिपाठ पाठ आहे

मोठ्या धेंडांची, द्रोह्यांशी, कधी साठगांठ आहे ॥११॥

कारागृहात षौक पुरवित, गुन्हेगार वाढत आहेत

तुमच्या आमच्या तोंडचे घास, त्यांच्या मुखी पडत आहेत. ॥१२॥

सागर सारे मलीन आहेत, नद्यांचीही वाटणी आहे

दीनदुबळ्यांसाठी मात्र, घोटभरच पाणी आहे ॥१३॥

रोज अमानुष बातम्यांनी मनामध्ये पेटतो जाळ

ठिणग्या उडतात तडतड, तोवर, त्यावर माती, लोटतो काळ ॥१४॥

करदात्या सामान्यांचे, सरणावरती जगणे आहे.

ठिकऱ्या होऊन, कुठल्यातरी स्फोटात नाहक मरणे आहे ॥१५॥

शंभर उंदीर मटकावून बोका करतोय तीर्था टन

पुन्हा नव्या पापासाठी स्वच्छ करून येतायत मन ॥१६॥

अशाच परंपरांना आता, महानतेचे वलय आहे

उदासवाण्या निराशेत, सामान्यांचा विलय आहे ॥१७॥

देवाच्यांही देवत्वाला, रोज नवा तडाआहे

पाप आणि पुण्याचा, आता एकच घडा आहे ॥१८॥

मंदीराच्या चिरेंबदीत, देव कोंडून बसला आहे

जीवनांतला राम मात्र, दूर निघून गेला आहे ॥१९॥

**- सुमन श्रीराम फडके**
रामचंद्र निवास, राममारूती रोड
दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८.

*With Best Compliments from*

**Baba Shukla**
**C.E.O.**

# buildtech

CONSULTANT
ENGINEERS
DEVELOPERS

**A ISO 9001:2000 Certified Company**

**Office:**

31, Jai Jawan CHS Ltd.
Near Apna Bazar, Sector 17,
Vashi,
Navi Mumbai: 400703.
Tel.: 022-66733895/6/7, 67912985
Fax.: 022-67912986

Email: baba@buildtech-engineers.com

रांगण

# माझ्या वेदनांची वही

अन्यायाचा उद्रेक झालाय फिर्यादीत नाही भलाई

माणसाच्या या हेव्यादाव्यात लुप्त झालीय अंगाई ॥धृ ॥

अहो १९४७ ने आपला भारत देश स्वतंत्र झाला

आणि ते घालवण्यासाठी ए.के. ४७ चा जन्म झाला

जखमी झालेल्या या हद्दीवर सांडतेय रक्ताची शाई ॥१ ॥

गोदावरीच्या काठावर न्हाहताना अंगावर येतो काटा

अडतात मग साऱ्या उद्‌धाराच्या या आशा न् वाटा

ही आपल्या फुले-शिवाजी-आंबेडकरांची नक्कीच नाही आई ॥२ ॥

वाटत आपल्या जीवनातील अत्तराचा थेंब द्यावा

आणि त्याच्या जीवनातील अश्रुचा थेंब प्यावा

आदिवासीच्या आजच्या मृत्पत्राचा वारस कुणी आहे भाई ॥३ ॥

अहो अन्यायाशी झुंजता आम्ही पेरीत नसतो युद्ध

माणुसकीच्या नात्यात आम्ही पेरीत असतो बुद्ध

काळोखात जाऊन संबंधाची पसरत चाललीय निळाई ॥४ ॥

तशातच सापडावी मला माझ्या वेदनांची वही

घाव सोसून सोसून त्यावर रक्तानं केलेली सही

अहो स्वार्थही करतोय बघा आज उगाचच घाई ॥५ ॥

**- सुरेंद्र यशवंत पाटील**
फ्लॅट नं. ८०२, विंग ए-१, न्यु आनंद पार्क टॉवर,
रघुनाथ नगर, रहेजा गार्डन जवळ, ठाणे (पश्चिम) ४०० ०६०४.

# दहशतवादीची पायवाट

हिंसेच्या संहारक गवतात
दहशतीची पायवाट झाली मरणात

जिहाद ध्येयाने होतात प्रेरित
अघोरी कृत्यास मानतात रीत

आतंकवादास नसतो कोणताही धर्म
असंख्य बळींनी करतात अधर्म

दहशतवाद्यांना नसे भीती कायद्याची
विकृती रूजते मनात सूडेची

अतिरेकी देतात सरकारला आव्हान
हिंसक बनून विसरतात मान

बॉम्बस्फोटात भरडे सामान्य जनता
मानवी समाजात व्यर्थ अस्थिरता

दहशतवाद संपविण्या व्हावे जागृत
फटीरतेच्या स्वार्थाने बनू नये मृत

मानव नसे दुबळे जनावर
सामर्थ्य दाखवावं घेऊन मनावर

व्हावे उच्चाटन सामाजिक अवगुणांचे
आत्मभान यावे नैतिक मूल्यांचे

**- उषा खंदारे**

*With Best Compliments from:*

संस्थापना: १९८७

*सहकारातून समाजकार्य! आम्ही बांधीले शिरोधार्य!!*

# शिव समर्थ सहकारी पतपेढी लिमिटेड

**प्रशासकीय कार्यालय: सेक्टर 5, एरोली, नवी मुंबई.**

दरध्वनी: २७६९८६८८/८९

नोंदणीकृत कार्यालय: २७६९ ७८३५

कोपरखैरणे शाखा: 27542904

डोंबिवली शाखा: 95251-2439066

**कार्यक्षेत्र:**

**नवी मुंबई,**

**ठाणे,**

**बृहन्मुबई**

**व रायगड.**

**सर्व शाखा पूर्णपणे संगणीकीकृत**

# मायमराठी

आस ती मायमराठीची
बोली ती महाराष्ट्राची
मराठमोळ्या संस्कृतीची
श्रीमंती शब्दभांडाराची

भाषा मनन चिंतनाची
सुविचार आकलण्याची
मनातील भावनांची
शब्दमाळ गुंफण्याची

सुबोध शब्दोच्चराची
लज्जत वाढे अर्थाची
रचना स्वर व्यंजनांची
जाण सक्षम साहित्याची

वाचा मृदू मार्दवतेची
मधुरता ती वाणीची
प्रचिती सुसंस्काराची
थोरवी मराठी भाषेची

**- मिलींद कल्याणकर**